# प्रकरण दुसरे

# कमवा व शिका योजना - स्वरूप व व्याप्ती

# प्रकरण - दुसरे

# कमवा व शिका योजना - स्वरूप व व्याप्ती

कोल्हापूर नगरीचे महान योगी, शिक्षणातून समाज उन्नतीचे स्वप्न साकार करणारे डॉ. आप्पासाहेब पवार हे शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. शिवाजी विद्यापीठ हे पहिले ग्रामीण विद्यापीठ होते. या विद्यापीठामध्ये बहुसंख्येने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा समावेश होता. ज्ञानाची गंगा गरीबांच्या झोपडीपर्यंत पोहचविण्यासाठी डॉ. आप्पासाहेब पवारांनी विविध योजनांची सुरूवात विद्यापीठ परिसरात केली. प्रतिकूल परिस्थितीत आत्मोन्नतीसाठी धडपडणाऱ्या ग्रामीण समाजातील गरीब होतकरून विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये सुरू असलेली 'कमवा व शिका' योजना विद्यापीठ परिसरात डॉ. आप्पासाहेब पवारांनी सुरू केली. विद्यार्थ्यांवर श्रमप्रतिष्ठा, स्वाभिमान, आत्मविश्वास इत्यादी मूल्यांचे संस्कार करणारी ही योजना आहे.

अशा या 'कमवा व शिका' योजनेची पार्श्वभूमी, स्वरूप आणि व्याप्ती यांची चर्चा प्रस्तुत प्रकरणात केलेली आहे.

**कमवा व शिका योजनेचा उगम :**

महाराष्ट्राच्या किंबहुना देशाच्या शैक्षणिक आणि सामाजिक जडणघडणीमध्ये महात्मा जोतीराव फुले, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. आप्पासाहेब पवार इत्यादी महनीय व्यक्तींचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेत पहिल्यापासूनच 'स्वावलंबी शिक्षणास' प्राधान्य दिले होते. ग्रामीण भागातील अज्ञान, अंधश्रद्धा, दुष्ट चालीरिती व गरीबीच्या अंध:कारात पिचत पडलेल्या समाजाला स्वाभिमानाने आणि स्वावलंबनाने जगण्याचा मार्ग शिक्षणातून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी दाखविला. डॉ. आप्पासाहेब पवार यांनी हाच वारसा पुढे चालविला आणि पदव्युत्तर शिक्षणापासून केवळ गरीबीमुळे

वंचित राहणाऱ्या खेड्यापाड्यातील होतकरू व हुशार विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' योजना सुरू केली.

योजनेने श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व विषद केलेले आहे. श्रमप्रतिष्ठेविषयी "न ऋते श्रांतस्य सख्याय देवा. . .!" म्हणजे श्रम केल्याशिवाय देवसुद्धा प्रसन्न होत नाही; असे भग्वत्गीतेतसुद्धा म्हटलेले आहे. तर 'जो श्रम न करता जेवतो तो साक्षात चोरच आहे' अशा प्रकारे ऋषीमुनींनी सुद्धा आपल्याला श्रमप्रतिष्ठेविषयी सांगितलेले आहे. त्याचप्रमाणे श्रमप्रतिष्ठेविषयी एक ग्रीक तत्त्ववेत्ता म्हणतो की, "Poverty is not a crime, but not to try transcend the limitation of poverty is a thoncond fold crime."[१] म्हणजेच गरिबी हा एक शाप नसून एकप्रकारचे वरदान आहे. त्यावर मात करण्यातच मुलांचा कस लागतो. तसेच महात्मा गांधीनीही आपल्या अकरा एकादश व्रतांमध्ये शरीरश्रमाला फार महत्त्वाचे स्थान दिले होते. त्याच पद्धतीने पंडित जवाहरलाल नेहरूंनी २० मार्च, १९६३ रोजी मुंबईत केलेल्या भाषणात श्रमप्रतिष्ठेबद्दल म्हटले होते की,

"Society on India divided people into three classes. Those who worked with their hands were considered low. Those who worked with their minds were considered high and those who did not work at all were considered the highest of the lot. Mr. Nehru exorted the people to give up these feudal notions."[२]

श्रमप्रतिष्ठेविषयी थोर कवी मंगेश पाडगांवकरांनीही म्हटले आहे की,

"जे कुणी नांगर घेऊनी खपती,
घाम गाळूनी अन्न पिकविती.
उपाशीच राहून आणिती,
उद्या स्वप्न धरेचे,
त्याचे राज्य उद्याचे!"[३]

अशाप्रकारे श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व विविध मान्यवरांनी विषद केलेले आहे. अशा श्रमप्रतिष्ठा या मौलिक तत्त्वावर ही 'कमवा व शिका'

योजना आधारलेली आहे. सुशिक्षित व सुसंस्कारीत असे नागरिक निर्माण करण्याचे कार्य या योजनेने केलेले आहे. परंतु या स्वावलंबी शिक्षणाची पार्श्वभूमी अगदी पुरातन काळापर्यंत जाते.

भारताला वैभवशाली असा प्राचीन वारसा लाभलेला आहे. प्राचीन काळी भारतात 'गुरूकुल' शिक्षणपद्धती अस्तित्त्वात होती. 'गुरूकुल' या शब्दातच या शिक्षणपद्धतीचा अर्थ सामावलेला आहे. या गुरूकुल शिक्षणपद्धतीत विद्यार्थी गुरूगृही गुरूच्या सानिध्यात राहून शिक्षण घेत असत. गुरूने आपल्याजवळ राहिलेल्या शिष्यांचे पालनपोषण करून त्यांना शिक्षण द्यावे व त्या बदल्यात गुरूगृही शिष्यांनी सर्व प्रकारची कामे करावी अशा प्रकारची ही शिक्षणपद्धती होती. गुरूकुलात वास्तव्य करत असताना सर्व प्रकारचे शारीरिक कष्ट सहन करण्याची शिष्याची तयारी असावी लागे. गुरूकुल शिक्षण संस्था प्राचीन वैदिक काळापासून ते आज एकविसाव्या शतकापर्यंत भारतात अस्तित्वात आहे. राम, कृष्ण, बलराम इत्यादिकांनी गुरूकुलात राहूनच विद्या संपादन केली असल्याचे अनेक दाखले पुराणात मिळतात.[४]

सुप्रसिद्ध स्विस शिक्षणतज्ञ जॉन हेन्रिक पेस्टालोझी याने इ.स. १७७४ मध्ये अट्ठावीस वर्षाचा असताना, पन्नास परित्यक्त मुलांना जमवून त्यांना लिहायला, वाचायला शिकविले. परंतु त्याचबरोबर बांधकाम, शेती व दुग्धव्यवसाय असे जीवनोपयोगी व्यवसायही शिकविले. निराधार आणि गरीब मुलांना शिक्षणाच्याद्वारे नवजीवन प्राप्त करून देण्याचा हा आधुनिक काळातील पहिलाच उदात्त प्रयत्न होता.[५]

शारीरिक श्रमांकडे शिक्षणाचे साधन म्हणून पाहण्याची कल्पना पेस्टालोझीचाच सहकारी फिलीप इमॅन्युएल फेलेनबर्ग (१७७१–१८४४) याने आणखी विकसित केली. शारीरिक श्रमांच्याद्वारे शिक्षण या योजनेवर फेलेनबर्ग या श्रीमंत गृहस्थाने आपला सारा पैसा व सारे जीवन व्यतीत केले.[६] फेलेनबर्ग यांचा हा शैक्षणिक आकृतीबंध संपूर्ण पश्चिमी जगात विशेषत: अमेरिकेत फार लोकप्रिय झाला. अमेरिकेतील सुरूवातीची

महाविद्यालये याच तत्त्वावर स्थापन करण्यात आली, असे बुब्रॅचर सांगतात.[७] अभ्यासक्रम अधिक समृद्ध करण्यासाठी त्यात शारीरिक श्रमांचा अंतर्भाव करणे हे अमेरिकेतील शारीरिक श्रम महाविद्यालयांचे उद्दिष्ट नसून परंपरागत शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करताना विद्यार्थ्यांना इतरांवर अवलंबून राहावे लागू नये हाच त्यामागचा खराखुरा हेतू होता.[८]

भारताच्या ग्रामीण भागात राहणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांच्या शिक्षणासाठी महात्मा गांधींनी 'मूलोद्योग शिक्षण पद्धतीचा' पुरस्कार केला होता. मुलांच्या श्रमातून भारतातील सार्वत्रिक शिक्षणाचा खर्च थोड्याफार प्रमाणवर भागविणे या विचारांवर महात्मा गांधीजींची 'मूलोद्योग शिक्षण पद्धती' प्रामुख्याने आधारलेली होती.[९] गांधीजींच्या या मूलोद्योग शिक्षण पद्धतीच्या अगोदरच कर्मवीर भाऊराव पाटलांनी 'शारिरीक श्रमांवर' भर दिल्याशिवाय गोरगरीब अशा बहुजन समजातील मुले शिकू शकणार नाहीत हे ओळखले होते. तसेच त्यांना दिले जाणारे शिक्षण हे केवळ मनाचे आणि बुद्धीचे ठेवून चालणार नाही, तर त्या शिक्षणामुळे मनाला, बुद्धीला जसा संस्कार मिळू शकतो त्याचप्रमाणे तो संस्कार माणसाच्या शरिरालाही मिळाला पाहिजे या धारणेतूनच कर्मवीरांनी स्वावलंबनातून शिक्षण या तत्त्वावर आपले शिक्षणकार्य आरंभिले होते.

कर्मवीर भाऊराव पाटील २५ जानेवारी ते १२ फेब्रुवारी, १९३५ या कालावधीत उत्तर भारतात प्रवासास गेले होते. हा प्रवास त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. प्रवासामध्ये कर्मवीरांनी कलकत्त्याजवळच्या बोलपूर येथील डॉ. रविंद्रनाथ टागोर यांच्या 'शांतीनिकेतन' या संस्थेस भेट दिली. या संस्थेतील सर्व वर्ग पावसाळा हा ऋतू वगळता वर्षभर आवारातील झाडांखाली निसर्गरम्य वातावरणात भरत असल्याचे कर्मवीरांनी आपल्या तीन दिवसांच्या मुक्कामात पाहिले. भाऊरावांनी डॉ. रविंद्र टागोरांची भेट घेवून शिक्षण विषयावर प्रदीर्घ चर्चा केली.[१०] पुढे कर्मवीर बिहारमधील पाटणा शहराजवळ असणाऱ्या पुरातन नालंदा विद्यापीठाचे अवशेष पाहावयास गेले. हे विद्यापीठ प्राचीन

भारतातील एक प्रमुख असे वसतिगृहयुक्त विद्यापीठ होते. “अनेक देशांमधील मुले शिक्षणासाठी हिंदुस्थानात येत असत. येथे 'तक्षशिला' आणि 'नालंदा' अशी मोठी विद्यापीठे अस्तित्वात होती. नालंदा विद्यापीठात १०,००० विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय होती. त्या सर्वांना मोफत शिक्षण दिले जाई, त्या बदल्यात हे विद्यार्थी विद्यापीठात विविध स्वरूपाची कामे करत असत. आणि त्यामुळे साऱ्या जगात संस्कृतीचे व शिक्षणाचे केंद्र म्हणून हिंदुस्थानची ख्याती होती. अशी माहिती भाऊरावांना तेथील व्यवस्थापकाकडून मिळाली. या आदर्श शिक्षण पद्धतीचा अंतर्भाव कर्मवीरांनी आपल्या वसतिगृहयुक्त शिक्षणाच्या कल्पनेमध्ये नंतर केल्याचे दिसून येते.[११] त्यानंतर पुढे भाऊराव पाटील आग्रा शहराजवळील 'दयाळबाग' या वसाहतीस भेट देण्यास गेले. ही एक १८,००० एकर जमिनीवर वसलेली स्वावलंबी व स्वतंत्र अशी जातिभेद विरहीत वसाहत होती.[१२] याची स्थापना १९१५ मध्ये स्वामी आनंदस्वरुप यांनी केलेली होती.[१३] येथील सर्व उद्योगधंदे ग्रामोद्योग स्वरूपात चालविले जात होते. तसेच तेथे राहणाऱ्या शेकडो पालकांच्या मुलांच्या शिक्षणासाठी प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन करण्यात आल्या होत्या. दयाळबागेचे व्यवस्थापक मंडळ या सर्व शिक्षण संस्थांचा खर्च आपल्या उद्योगधंद्यांच्या उत्पन्नातून करीत असे. कर्मवीर 'दयाळ बाग' संस्थेच्या कामाने फारच प्रभावित झाले होते.[१४]

या उत्तर भारताच्या प्रवासाहून आल्यानंतर ग्रामीण भागातील गुणी व होतकरू मुलांच्या शिक्षणाची एक निश्चित अशी दिशा भाऊरावांना गवसली. नंतर २५ एप्रिल, १९३५ मध्ये रयत शिक्षण संस्था भाऊरावांनी रजिस्टर करून संस्थेच्या शाखा स्वावलंबनाच्या तत्त्वाला अनुसरून वाढविण्यास सुरूवात केली.[१५] कोणत्याही गुणी आणि होतकरू मुलाला घरच्या गरिबीमुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये अशी कर्मवीरांची धारणा होती. म्हणूनच त्यांनी शाळा महाविद्यालयामध्ये शारीरिक श्रमांवर विशेष भर दिला. सन १९४७ मध्ये कर्मवीरांनी मोफत व वसतिगृहयुक्त

अशा 'छत्रपती शिवाजी कॉलेज'ची स्थापना साताऱ्यात केली. या कॉलेजमध्ये कर्मवीरांनी श्रममूल्यांवर आधारित 'कमवा व शिका' ही क्रांतिकारी आणि आदर्श अशी योजना सुरू करून स्वावलंबी शिक्षणाला एक आदर्श अशी चौकट निर्माण केली.[१६]

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 'कमवा व शिका' हे मौलिक तत्त्व रयत शिक्षण संस्थेच्या कार्यात आणून शिक्षणातून माणसाचे मन व शरीर सुसंस्कारित होवू शकते हे सिद्ध करून दाखविले होते. अशा या युगप्रवर्तक योजनेचे महत्त्व, उपयोगिता आणि त्याचे ग्रामीण भागावर होणारे परिणाम डॉ. आप्पासाहेब पवार जाणून होते. आर्थिक परिस्थितीने गांजलेल्या पण ज्ञानाची इच्छा असणाऱ्या समाजाला एक नवी दृष्टी, नव विचार, नवी दिशा देण्यासाठी डॉ. आप्पासाहेब पवार यांनी ही 'कमवा व शिका' योजना विद्यापीठ परिसरात १९६९ साली सुरू केली.[१७]

## 'कमवा व शिका' योजना सुरू करण्यामागची कर्मवीरांची मुलभूत तत्त्वे :

शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना लाचार व्हावे लागते. याचा भाऊरावांना खूप राग येत असे. आपल्या शैक्षणिक फीसाठी शाळा—कॉलेजातील मुलांनी कोणाकडे तरी याचना करावी किंवा वार पद्धतीने जेवणाची सोय करून घ्यावी हे ही कर्मवीरांना मान्य नव्हते. विशेषत: गरीब कुटुंबातील मुलांनी शिक्षणासाठी आईवडिलांवर अवलंबून राहणे कर्मवीरांना आवडत नव्हते. मात्र जो विद्यार्थी कष्ट करायला तयार आहे व शिक्षण घेण्याची ज्याची इच्छा आहे तो त्याच्या आवडीच्या शिक्षणापासून दूर राहता कामा नये. इतरांच्या मेहेरबानीवर अवलंबून राहून वेळेवर परीक्षा उत्तीर्ण होण्यापेक्षा थोडा अधिक वेळ लागला तरी विद्यार्थ्यांनी स्वावलंबी होणेच अधिक श्रेयस्कर आहे, अशी कर्मवीरांची विचारसरणी होती.[१८] भारतासारख्या गरीब देशाला सर्वांगिण आणि सार्वत्रिक शिक्षण घ्यावयाचे असेल तर स्वावलंबन आणि शारीरिक श्रम यांचा अवलंब केल्याशिवाय गत्यंतर नाही, असे कर्मवीरांचे ठाम मत होते. कर्मवीर

भाऊराव पाटील यांनी आपल्या 'कमवा व शिका' योजनेद्वारे हा क्रांतीकारी विचार अंमलात आणला.

**भाऊरावांनी सिद्ध केलेल्या प्रयोगाची तत्त्वे खालीलप्रमाणे सांगता येतात :**

१. प्रत्येक विद्यार्थ्याने श्रम केलेच पाहिजे.

२. हे श्रम व्यवहारिक कसोटीवरही उतरतील असे उत्पादक असले पाहिजे.

३. या श्रमाच्या बाबतीत बुद्धीमान—कमी बुद्धीमान, श्रीमंत—गरीब असा भेदभाव विद्यार्थ्यांमध्ये केला जाता कामा नये.

४. या श्रमाला पूरक असे कांही सहाय्य विद्यार्थ्याला शिक्षण व्यवस्थेने केले पाहिजे.

५. यानंतर उरणारा भाग बिनव्याजी कर्जरूपाने विद्यार्थ्याला मिळण्याची तरतूद असली पाहिजे.[१९]

## 'कमवा व शिका' योजना सुरू करण्याची डॉ. आप्पासाहेब पवारांची उद्दिष्टये :—

कर्मवीर भाऊराव पाटलांनी अंमलात आणलेल्या मूलभूत तत्त्वांच्या आचरणाने तळागाळातल्या बहुजन समाजावर उच्च शिक्षणाचे संस्कार केले तरच समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेला वेग येईल हे डॉ. आप्पासाहेब पवारांनी जाणले होते. त्यामुळे विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू मानून त्यांच्या हिताचा, गुणसंवर्धनाचा ध्यास घेवून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी विद्यापीठ परिसराला आकार दिला. विद्यार्थ्यासाठी अनेक कल्याणकारी योजना अंमलात आणल्या व यशस्वीही करून दाखविल्या. तरूण विद्यार्थी हा राष्ट्राचा ठेवा आहे हे जाणून येथील तरूण विद्यार्थ्यांची मने आणि मनगटे साधण्याची किमया डॉ. आप्पासाहेब पवार यांनी विद्यार्थी भवन येथील 'कमवा व शिका' योजनेद्वारे साधली. ही योजना सुरू करण्यामागे डॉ. पवारांची काही उद्दिष्टये होती. ती पुढीलप्रमाणे सांगता येतील :—

१. गरीब व गरजू मुलांना उच्च शिक्षणाची सुविधा पुरविणे.

२. श्रमांवर आधारित शिक्षण देणे.

३. स्वावलंबी शिक्षण पद्धतीचा विकास करणे.

४. विद्यार्थ्यांत श्रमप्रतिष्ठा वाढीस लावणे.

५. विद्यार्थ्यांची मानसिक व शारीरिक क्षमता वाढविणे.

६. विद्यार्थ्यांच्यात सर्व धर्म समभावना वाढीस लावून समतेची भावना निर्माण करणे.[२०]

देशातील ७५ टक्के जनता ही ग्रामीण भागात राहते. शिक्षणाला श्रमाची जोड देणाऱ्या या 'कमवा व शिका' योजनेमुळे आपण उच्च शिक्षण घेवू शकतो याची जाणीव झाल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी या योजनेकडे आकर्षित झाले. या योजनेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे योजनेद्वारे शिकलेला विद्यार्थी केवळ पुस्तकी न राहता कोणत्याही कठीण परिस्थितीत स्वत:च्या हिंमतीवर उभा राहू शकतो. तसे कष्ट करण्याची सवय असल्यामुळे योजनेतील विद्यार्थी शिक्षण व श्रम यांच्या संयोगातून मोठी प्रगती घडवू शकतो. आपल्या शेतीप्रधान व विकसनशील भारत देशाला प्रगती करण्यासाठी अशा प्रकारच्या योजनेची आवश्यकता आहे अशी डॉ. आप्पासाहेब पवारांची धारणा होती.

## कमवा व शिका योजनेचे स्वरूप :

माणूस निसर्गाशी, शेती करताना झाडांशी व फुलांशी बोलत असताना नवीन विचार करतो. श्रम करणारा माणूस कोणत्याही संकटातून मार्ग काढू शकतो अशी आप्पासाहेबांची भूमिका होती. आयुष्यात पैशापेक्षा माणूसकी श्रेष्ठ आहे अशी शिकवण देवून समाजाला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी गुरूकुल शिक्षणापासून निर्माण झालेल्या श्रमातून समता व समतेतून मानवता हा धागा पकडून निर्माण झालेल्या 'कमवा व शिका' या आदर्श योजनेची शिवाजी विद्यापीठात विद्यापीठ स्तरावर सुरूवात करून डॉ. आप्पासाहेब पवारांनी एका नव्या पर्वाची सुरूवात केली. शिवाजी विद्यापीठाच्या अनेक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांपैकी डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनच्या विद्यमाने कार्यरत असणारी 'कमवा व शिका' योजना हा एक अभिनव उपक्रम आहे.

कोणत्याही शैक्षणिक कार्याचा केंद्रबिंदू विद्यार्थी असतो. त्या विद्यार्थ्याचा शैक्षणिक, शारिरीक, बौद्धिक आणि वैचारिक असा सर्वांगिण विकास साधणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. हा विकास साधण्याकरता आवश्यक ते वातावरण सर्वच विद्यार्थ्यांना उपलब्ध होत नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अनंत अडचणींना सामोरे जावे लागते. या अडचणींवर मात करून ग्रामीण भागातील लाजऱ्या—बुजऱ्या विद्यार्थ्यांना एकत्र आणणे, विचारांची देवाणघेवाण घडवून आणणे, त्यांच्यात भावनात्मक ऐक्य घडवून आणणे, वरिष्ठ—कनिष्ठ भेद नाहीसे करणे, राष्ट्रनिर्मितीची एक शक्ती म्हणून नागरिक घडविणे या उद्देशानेच ही योजना सुरू झालेली आहे.[२१]

'कमवा व शिका' योजना कोणत्या स्वरूपात चालविली जाणार आहे. त्याची झलक विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी बांधलेल्या "विद्यार्थी भवन" या वास्तूच्या निर्मितीत दिसून आली. डॉ. आप्पासाहेब पवार यांनी विद्यापीठात 'कमवा व शिका' योजनेतील मुलांसाठी वास्तू उभी करण्याकामी विद्यार्थ्यांच्या उर्मीचा आणि शक्तीचा अतिशय कल्पकतेने वापर करून घेतला. त्यांनी दि. ८ एप्रिल ते १२ जून, १९६८ या कालावधीत 'विद्यार्थी भवन' बांधण्यासाठी श्रमदान शिबीर आयोजित केले.[२२] विद्यार्थ्यांनीच इमारतीचा पाया खणला, त्यांनीच पाया भरला, त्यांनीच विटा तयार केल्या, इमारतीचा प्लॅनही त्यांनीच तयार केला. ही सर्व कामे विद्यार्थ्यांनी या दोन महिन्याच्या काळात विद्यापीठ अभियंत्यांच्या मार्गदर्शनाखाली केली.[२३] या श्रमदान शिबीरात विद्यार्थीनीही मोठ्या उत्साहाने सहभागी झाल्या होत्या.[२४] विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी 'विद्यार्थी भवन' श्रमदानातून बांधणे ही शिक्षण क्षेत्रातील एक लक्षणीय घटना होती. अर्थात यामागे डॉ. आप्पासाहेब पवार यांची प्रेरणा होती. म्हणूनच विद्यार्थी भवनाला 'डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन' असे नाव देण्यात आले.[२५] स्वत:चे काम स्वत:च करण्याच्या तत्त्वाचा अंगिकार करून ते प्रत्यक्षात आणले तर विधायक कार्य घडून येते. याचे प्रत्यंतर भवनच्या निर्मितीत दिसून आल्यानंतर, या भवनमध्ये गरीब पण बुद्धीने तल्लख विद्यार्थ्यांना

प्रवेश देऊन त्यांच्या राहण्याचा व जेवणाचा खर्च करण्याचे ठरले. त्या बदल्यात विद्यार्थ्याने रोज तीन तास शेतीत काम करावे आणि श्रमाद्वारे ज्ञानाची प्राप्ती करावी अशा स्वरूपात प्रथम 'कमवा व शिका' योजना सुरू करण्यात आली.[२६]

या 'कमवा व शिका' योजनेमुळे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील गरीब पण होतकरू व हुशार विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय झाली. विद्यापीठाचा परिसर फार मोठा होता. जरी ते ओसाड माळरान असले तरी तेथे शेतीयोग्य जमीनही भरपूर होती. ही शेती योग्य अशी पिकाखालील जमीन विद्यापीठच्या 'कमवा व शिका' योजनेचा मूलभूत आधार होती. प्रायोगिक तत्त्वावर या योजनेत प्रथम २५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. विद्यापीठ परिसरातील १५० एकर शेती योग्य जमीन ही या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना कसण्यास देण्यात आली. प्रायोगिक तत्त्वावर ६ एकर जमीन शेतीसाठी योजनेला देण्यात आली.[२७] या जमिनीत प्रथमतः भुईमूगाचे भरघोस आलेले उत्पादन पाहून डॉ. आप्पासाहेब पवारांनी विद्यापीठ परिसरातील १५० एकर शेती योग्य क्षेत्र या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना कसण्यास देण्यात आले.[२८] शेतीसाठी लागारे सर्व साहित्य प्रथम विद्यापीठाने पुरविले होते. शेतीची सर्व मशागत ही विद्यार्थीच करत असत. प्रसंगी बाहेरच्याही मजूरांची मदत घेतली जात असे. परंतु शेतीचे जास्तीत जास्त काम हे विद्यार्थीच करत असत.[२९] जमिनीतून येणाऱ्या उत्पन्नाचा अर्धा हिस्सा विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवला जाई. विद्यार्थ्यांना वेतनमूल्य म्हणून दरमहा ६० रूपये दिले जात असत. ते विद्यार्थी कल्याण मंडळात जमा केले जात असत. त्यातून त्यांचे राहणे, जेवणे व विद्यापीठाच्या सर्व फी यांचा खर्च यातून केला जाते असे.[३०] विद्यार्थी या शेतीमधून भात, भुईमूग, ज्वारी, ऊस इत्यादी पिके प्रामुख्याने घेत असत. त्याचप्रमाणे होस्टेलला लागणारा भाजीपालाही पिकवत होते. 'कमवा व शिका' योजनेचे शेती हेच प्रामुख्याने कार्यक्षेत्र होते. त्याचबरोबर पिठाची गिरणी चालविणे, हायवे कँटीन चालविणे, विद्यार्थी—विद्यार्थीनींच्या मेस चालविणे, विटा तयार करणे,

पशुपालन करून दूध विक्री करणे, बांधकामात मदत करणे इत्यादी प्रकारची कामेही करत असत.[३१] याचबरोबर काळानुरूप योजनेतील लायब्ररीत काम करणे, झेरॉक्स मशीन चालविणे, एस.टी.डी. बुथ चालविणे, अंशकालिन लेखनिक म्हणून काम करणे, अशा नवीन स्वरूपातील कामाचाही समावेश करण्यात आला.[३२]

या योजनेत सहभागी मुलांत जातीवरून भेदभाव केला जात नसे. मराठी, ब्राम्हण, दलित, मुस्लीम अशा सर्व जातीधर्मांच्या मुलांचा या योजनेत समावेश होता. ज्याची श्रम करण्याची तयारी आहे अशा कोणत्याही विद्यार्थ्याला संधी नाकारली जात नव्हती.[३३] तसेच योजनेची दैनंदिन कामाची पद्धतीही नाविन्यपूर्ण अशा 'डे ऑफिसर – मुलांपैकी त्या दिवसाचा प्रमुख कार्यवाहक' पद्धतीने पाहिले जात होते. क्रमाक्रमाने विद्यार्थी हे काम पाहत असतात. प्रत्येक दिवशी नवीन 'डे ऑफिसर' असे. त्या दिवशीचे संपूर्ण काम त्या 'डे ऑफिसर'च्या मार्गदर्शनाने चाले. त्याच्या कामाची सुरूवात पहाटे ५.३० ला द्यावयाच्या घंटीने होते. 'डे ऑफिसर' सर्व विद्यार्थी उठले की नाहीत ते पाहतो. सकाळी ६.४५ ला त्याने दुसरी बेल देताच सर्व विद्यार्थी विधी व व्यायाम आटोपून तयार होवून एकत्र जमतात. त्यावेळी 'डे ऑफिसर' त्यांना दिवसाच्या कामाचे नियोजन सांगे. त्यानंतर तो प्रत्येकाच्या कामावर लक्ष ठेवून प्रसंगी कामाबद्दल काही सूचनाही देतो. या पद्धतीमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला 'डे ऑफिसर' बनून नियोजन करावे लागते, यामुळे काम चोख करण्याची वृत्ती व शिस्त विद्यार्थ्यांच्या अंगी बाणली जात असे.[३४]

'कमवा व शिका' ही योजना विद्यापीठाला काही उत्पन्न मिळवून देण्यासाठी स्थापन झालेली योजना नसून गरीब व गरजू मुलांच्या उच्च शिक्षणासाठी स्थापन झालेली योजना होती. विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे, संयोजनाचे आणि प्रतिकूल परिस्थितीशी झगडण्याचे संस्कार देणाऱ्या स्वरूपातील ही योजना होती. जरी काळानुरूप योजनेतील कामाचे स्वरूप बदलले असले तरीही गरजू व होतकरू मुलांना त्याची जातपात न पाहता

श्रमाच्या मोबदल्यात उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे हे या योजनेचे मूलभूत स्वरूप आजही कायम आहे.

**'कमवा व शिका' योजनेची व्याप्ती :**

आज आपल्या देशाला नितिमत्तेवर आधारलेल्या मूल्याधिष्ठित शिक्षणाची गरज आहे. कारण आज देशात शिक्षणाचा प्रसार झाला आहे आपला समाजही पुढे पुढे जात आहे; परंतु समाजात काही ठिकाणी एका तऱ्हेचे औदासिन्य आल्यासारखेही दिसते. 'काय करायचे शिक्षण? काय उपयोग त्याचा? त्याने नोकरी मिळत नाही' असे विचार ऐकायला मिळतात. पण हे चुकीचे आहे. नोकरी मिळविण्यासाठी शिक्षण नाही. जगण्यासाठी नोकरी व नोकरीसाठी शिक्षण हे त्रैराशिकच चुकीचे आहे. ह्यातून आपण बाहेर पडले पाहिजे. कारण शिक्षण हे माणसाला मोठे करण्याचे साधन आहे. त्याची शारीरिक व मानसिक क्षमता वाढविण्यासाठी शिक्षण आहे. आणि असे शिक्षण 'कमवा व शिका' योजनेच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न होत आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेत पहिल्यापासून 'स्वावलंबी शिक्षणास' अग्रक्रम दिला होता.

"Give us waste land and we shall turn it into the best land and rub your hands with the land" हे कर्मवीरांचे दोन मूलमंत्र होते.[३५] या मूलमंत्रांच्या समावेशाने सातारच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये कर्मवीरांनी उच्च शिक्षणाचा पाया भक्कम केला. डॉ. आप्पासाहेब पवारांनी हाच वारसा पुढे चालवून विद्यापीठ स्तरावर 'कमवा व शिका' ही योजना कार्यान्वित केली. अशा या योजनेने सामाजिक व शैक्षणिक परिवर्तनात महत्त्वपूर्ण असे योगदान दिलेले आहे. अशा या योजनेची व्याप्ती व्यापक अशी आहे.

'कमवा व शिका' हा दृष्टीकोन म्हणजे फारच व्यापक व सुरेख दृष्टीकोन आहे. शिक्षणशास्त्रदृष्ट्या मनुष्याच्या मेंदूची वाढ जी झालेली आहे, ती प्राथमिक अवस्थेत हात व मेंदू यांच्या सहकार्यानेच झाली आहे. यातूनच माणसाचा सामाजिक विकास होत गेला आणि जग

बदलायला लागले. हे सगळे घडले ते हाताच्या आणि मेंदूच्या संयोगामुळे काम करा, मिळवा आणि अनुभवाने शिका असाच याचा अर्थ होतो.

'कमवा व शिका' या योजनेत स्वावलंबन हे पायाभूत तत्त्व आहे. हेच तत्त्व गौतम बुद्धांचेही होते. स्वावलंबी व्हा, स्वयंप्रकाशित व्हा, हाच बुद्धांचा संदेश होता. स्वावलंबन म्हणजे गुलामगिरीचा अभाव, स्वावलंबन म्हणजे स्वातंत्र्य—स्वराज्य होय. स्वावलंबन सांभाळणे हे जसे बुद्धांचे ध्येय होते. तसे ते महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. आप्पासाहेब पवार यांचेही होते. "स्वयेचि कष्टित गेला। तोचि भला रे भला।।", "जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्यभाग बुडाला।।", "आपली आपण करा सोडवण" अशी कितीतरी संतवचने स्वावलंबनाचे महत्त्व सांगतात. ध्यान करावयाचे झाल्यास ज्याचे त्याने केले पाहिजे. अभ्यास करावयाचा झाल्यास विद्यार्थ्यांनी स्वत:च केला पाहिजे. विद्यार्थ्यांचा आईबापांवर शिक्षणाचा बोजा पडू नये म्हणून 'कमवा व शिका' योजना सुरू झाली. वाढत्या महागाईत हा मंत्र तर फारच जरूरी आहे. कारण या योजनेचे विद्यार्थी स्वत:ची कामे स्वत: करताना, काटकसरीचे धडे गिरवून स्वावलंबी होतात असा योजनेचा लौकिक आहे.

या योजनेत कोणत्याही स्वरूपाची जातपात मानली जात नाही. विद्यार्थ्यांचे श्रम हेच त्यांचे खरे भांडवल होते अशा प्रकारे जातिभेदास मूठमाती देणारी ही व्यापक अशी योजना होती. श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या या योजनेने शिक्षण प्रसाराला साहाय्य केले असले तरी याचा लाभ मर्यादित विद्यार्थ्यांनाच होत होता. कितीही झाले तरी 'रयत शिक्षण संस्था', 'शिवाजी विद्यापीठ' या संस्थाच होत्या. त्यांचे कार्यक्षेत्रही मर्यादित होते. इच्छा असूनही त्यांना मोफत शिक्षण देता येत नव्हते. त्यामुळे 'कमवा व शिका' योजनेपासून प्रेरणा घेवून सरकारने १९५९ ला ई. बी.सी. सवलत जाहीर करून ग्रामीण भागासाठी मोफत शिक्षणाची तरतूद केली.[३६] या ई.बी.सी. सवलतीमुळे श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व कमी झाले. परंतु जेवढे विद्यार्थी या योजनेद्वारे शिकले नाहीत तेवढे विद्यार्थी या सवलतींचा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.



16343

फायदा घेवून शिकले. जरी ई.बी.सी. सवलतीमुळे गुणात्मक तोटा झाला असला तरी संख्यात्मकदृष्ट्या फायदाच झाला. या अर्थाने 'कमवा व शिका' या सर्वसमावेशक संकल्पनेचा विजयच झाला आहे.

'कमवा व शिका' योजनेत प्रवेश न मिळालेले परंतु याचा आदर्श घेवून बाहेर खाजगी क्षेत्रातील हॉटेल, दवाखाने, कंपन्या इत्यादी ठिकाणी काम करून शिक्षण घेणारे विद्यार्थी म्हणजेच या योजनेच्या अदृश्य व्याप्तीचाच भाग आहे. आज रयत शिक्षण संस्थेच्या १३ शाखांमध्ये 'कमवा व शिका' योजना चालू आहे.[३७] तसेच अखिल भारतात १५२ विद्यापीठांतही 'कमवा व शिका' योजनेचे अनुकरण करण्याचे प्रयत्न झाले आहेत.[३८]

आजच्या शिक्षण व्यवस्थेतील काही त्रुटी सोडविण्यासाठी या 'कमवा व शिका' योजनेचा खूप उपयोग आहे. कारण अलिकडे शिक्षणाचा प्रसार भरपूर झालेला आहे, नवी विद्यापीठे स्थापन होत आहेत, पदवीधरांची संख्या वाढत आहे व शासनाचा शिक्षणावरील खर्चही वाढतो आहे. पण आजही उच्च शिक्षणावर होणारा खर्च हा ३० टक्के हक्कदारांच्या वर्गावरच होतो आणि ७० टक्के असंघटित लोक उच्च शिक्षणापासून वंचितच आहेत. अशा तऱ्हेचे हे शैक्षणिक दारिद्र्य नष्ट करण्यासाठी 'कमवा व शिका' या योजनेचा वापर फार महत्त्वाचा ठरू शकतो.[३९]

आजच्या काळात शिवाजी विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या स्मृती जपून त्यांचे विचार व संस्कारांची जपणूक करणाऱ्या 'कमवा व शिका' योजनेचा विस्तार झाला आहे. सन १९९०—१९९१ पासून विद्यापीठात या योजनेमध्ये विद्यार्थीनींचाही समावेश करण्यात आलेला आहे.[४०] सन २००४—२००५ मध्ये विद्यार्थी भवनच्या इमारतीचे विस्तारिकरण करून त्यामध्ये सुमारे १०० विद्यार्थ्यांची सोय केली जात आहे.[४१] तसेच आर्थिक अडचणींमुळे इच्छुक विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहता कामा नये या विचाराने प्रेरित होवून शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी 'कमवा व

शिका' योजनेला अधिक व्यापक स्वरूप दिले आहे. 'मागेल त्याला काम' व 'मागेल त्याला निवास' या योजनेची सुरूवात विद्यापीठात केली. त्या अंतर्गत २००४—२००५ साली ३२५ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.[४२]

आधुनिक काळात कॉम्प्युटर लॅब, आय.टी. सेंटर अशी नवनवीन कामाची क्षेत्रे विद्यापीठाच्या बाहेर निर्माण झाल्यामुळे या योजनेची व्याप्ती विद्यापीठाच्या बाहेरही वाढत आहे.

सध्याच्या युगात शिक्षण हा संस्कार राहिला नसून ती एक यांत्रिक, भावनाशून्य कृती बनली आहे. शाळा, कॉलेज, विद्यापीठे ही संस्कार केंद्रे न राहता फक्त नोकरी मिळवून देणारी, प्रमाणपत्र वितरण करणारी केंद्रे बनली आहेत. पण शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे एक साधन आहे. त्यामुळे सुदृढ, सुसंस्कारित, नितीमान असे नागरिक घडविणाऱ्या 'कमवा व शिका' योजनाच खऱ्या अर्थाने आजच्या शिक्षण क्षेत्राला तारक ठरू शकेल.

**संदर्भ :**


१) 'श्रमयोगी' कमवा आणि शिका योजनेचा रौप्यमहोत्सवी समारंभ अंक, प्रकाशन २१ ऑगस्ट १९९५, पृष्ठ — १०.

२) कित्ता, पृष्ठ — १०

३) पाडगावकर मंगेश, 'धारानृत्य' काव्यसंग्रह — 'त्यांचे राज्य उद्याचे ही कविता'

४) तर्कतीर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश, खंड क्र. ५, पृष्ठ—१४५.

५) मॅथ्यू ए. व्ही., मराठी अनुवाद वाळिंबे वि. स., कर्मवीर भाऊराव पाटील, १९८८, पृष्ठ — १९४.

६) कित्ता, पृष्ठ — १९५.

७) कित्ता, पृष्ठ — १९५.

८) कित्ता, पृष्ठ — १९५.

९) ताटके अरविंद, महात्मा गांधी, पृष्ठ — ४६६.

१०) ठोके बा. म., मला समजलेले कर्मवीर, पृष्ठ — ९१.

११) Patil P. G., The Bountiful Banyan – A Biography of Karmaveer Bhaurao Patil, Volume 2, P. 16.

१२) Ibid, P. 17

१३) ठोके बा. म., उपरोक्त, पृष्ठ — ९२.

१४) कित्ता, पृष्ठ — ९२.

१५) काटकर मा. भि., प्रबोधनाची धगधगती मशाल, प्रथमावृत्ती, १९८९, पृष्ठ — ६९.

१६) कित्ता, पृष्ठ — ६९.

१७) 'श्रमयोगी' उपरोक्त पृष्ठ — ६.

१८) मॅथ्यू ए. व्ही., अनुवादित वाळिंबे वि. स., उपरोक्त पृष्ठ — ३३९.

१९) प्राचार्य दाभोळकर देवदत्त, रयत शिक्षण संस्था, सातारा, हीरक महोत्सव स्मरणिका, १९८२, पृष्ठ — ६.

२०) मुलाखत : प्रा. डॉ. पवार सी. टी, दि. १९/९/२००८ व मुलाखत : प्राचार्य कुंभार भैरव, दि. १९/९/२००८.

२१) वार्षिक अहवाल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६९—७०, पृष्ठ — ४ ते ५.

२२) शिवसंदेश त्रैमासिक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ऑक्टोबर — डिसेंबर, १९६८, पृष्ठ — १८—२३.

२३) कित्ता, पृष्ठ — २०.

२४) कित्ता, पृष्ठ — २२.

२५) कित्ता, पृष्ठ — २३

२६) 'श्रमयोगी', उपरोक्त पृष्ठ — २४.

२७) कित्ता पृष्ठ — २४.

२८) कित्ता पृष्ठ — २४.

२९) 'पितामह', कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार जन्मशताब्दी स्मृती ग्रंथ, ५ मे २००६, पृष्ठ — ५०.

३०) कित्ता, पृष्ठ — ५०.

३१) मुलाखत : डॉ. कुंभार ए. पी., दि. १४/७/२००८.

३२) मुलाखत : प्राचार्य जाधव जे. जी., दि. १५/९/२००८.

३३) मुलाखत : प्राचार्य डॉ. लिपारे व्ही., एस्. दि. २/९/२००८.

३४) 'श्रमयोगी', उपरोक्त पृष्ठ — १६.

३५) 'पितामह', उपरोक्त, पृष्ठ — ५६.

३६) प्राचार्य गायकवाड आर. डी., 'छत्रपती शिवाजी कॉलेज, शाखा इतिहास पुस्तिका', पृष्ठ — ७.

३७) Pawar B. G., Father of Rural Education – Karmaveer Bhaurao Patil, 1987, P. 88.

३८) 'श्रमयोगी', उपरोक्त, पृष्ठ — ५४

३९) कुलगुरू, प्राचार्य कणबरकर आर. के., रयत शिक्षण संस्था, हीरक महोत्सव स्मरणिका, १९८२, पृष्ठ — ७८.

४०) प्राचार्य जाधव जे. जी., मुलाखत दि. १५/९/२००८.

४१) मुलाखत : प्रा. डॉ. गुरव पी. एम., रेक्टर, आप्पासाहेब विद्यार्थी भवन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, दि. ५/९/२००८.

४२) 'पितामह', उपरोक्त, पृष्ठ — ५७.